"A"
Re-accredited by
NAAC (2014)
With CGP-A 3.16

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE : EPAX-2690571, 293730**
**FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333 Affi. Ext. 9089, 9090**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६९०५७१ (विस्तारीत क्रमांक - ९०८९, ९०९०)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.
Website : www.unishivaji.ac.in e-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

**जा.क्र. संलग्नता/टे.१/लोहार/** 169 **दिनांक :** 12 MAR 2015

**प्रति,**
**मा.प्राचार्य/ मा. संचालक,**
**सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.**

**विषय :-** महविद्यालयीन अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना,

**संदर्भ :-** १).क्र. संकिर्ण-२०१०/(५०३/१०)विशि-१ दि.०५ मार्च, २०१११ चा शासन निर्णय,
२).क्र. संकिर्ण-२०११/(३९३/११)विशि-१ दि.२३ नोव्हेंबर, २०११ चा शासन निर्णय,
३).क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि.२३ फेब्रुवारी, २०११ चे शासन शुध्दीपत्रक,
४).क्र. युएनआय/सेनिवा/नावि/विशि-१/९६५ दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, आपल्या महाविद्यालयातील जे शिक्षक नियत वयोमानानुसार होणार आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना यापूर्वी या कार्यालयाच्या दि.१० मे, २०१२ रोजीच्या परिपत्रकाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना पाठविण्यात आल्या आहेत. तथापी शासनाने संदर्भ क्र.०४ च्या पत्राने सुधारीत सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर पत्राची प्रत सोबत पाठवित आहोत.

तेंव्हा महाविद्यालयीन प्राचार्यांच्या /शिक्षकांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्यासंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या दि.१० मे, २०१२ च्या मार्गशदर्शक सूचना विचारात घेवून तसचे सोबतचे शासनपत्र अवलोकनी घेवून सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबचे प्रस्ताव विहित केलेल्या कालावधीमध्ये विद्यापीठास सादर करण्यात यावेत. विहित मुदतीत प्रस्ताव न आल्यास त्याअनुषंगाने निर्माण होणा-या तक्रारी अथवा न्यायालयीन प्रकरणे यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता विभाग

सोबत : वरील प्रमाणे.

सदरचे पत्र व त्याची जोडपत्रे विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD-Circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
www.dhepune.gov.in e-mail-vishi.dhepune@nic.in.
फोन नंबर -०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स नंबर ०२०/२६१११९५३

क्रमांक-युएनआय/सेनिवा/नावि/विशि-१ 965 दिनांक- ३० जाने, २०१५

प्रति,

१.कुलसचिव
सर्व अकृषि विद्यापीठे.

२.परीक्षा नियंत्रक,
सर्व अकृषि विद्यापीठे.

**विषय- अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापक तसेच संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वयोमर्यादा वाढीबाबत आयोजित करण्यात येणाऱ्या कामकाज आढावा समितीच्या बैठकाबाबत.**

संदर्भ-१. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण२०१०/(५०३/१०)/विशि-१ दिनांक ५ मार्च, २०११
२.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण२०११/(३९६/११)/विशि-१ दिनांक २३ नोव्हे, २०११
३. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण२०११/(३९६/११)/विशि-१ दिनांक२३ फेब्रुवारी,२०१२

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयानुसार कळविण्यात येते की, राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापक, प्राचार्य यांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत शासनाने वेळोवेळी निर्णय घेतलेले आहेत. या निर्णयाच्या अनुषंगाने निर्देशित केल्याप्रमाणे आढावा समिती गठीत करण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये (अ) प्राचार्य पदासाठी संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु/प्र-कुलगुरु अध्यक्ष व संचालक उच्च शिक्षण सदस्य (ब) अकृषि विद्यापीठातील अध्यापकांसाठी कुलगुरु/प्र-कुलगुरु अध्यक्ष व संचालक उच्च शिक्षण सदस्य (क) अशासकीय महाविद्यालयातील अध्यापक पदासाठी संबंधित विद्यापीठाचे प्र-कुलगुरु किंवा संचालक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ अध्यक्ष व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण सदस्य यांच्या नियुक्ती करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त आढावा समितीमध्ये संचालक उच्च शिक्षण व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण हे सदस्य असल्याने दरमहा किंवा महिन्यातून दोन वेळा देखील या बैठकीस उपस्थित राहणे शक्य होत नाही.

...2/-

राज्यातील सर्वच विद्यापीठांच्या आढावा समितीमध्ये संचालकांना उपस्थित राहणेही शक्य होत नाही. कारण विद्यापीठे ही त्यांचे स्तरावर आढावा समितीचे आयोजन करतात. व संचालकांची सुयोग्य वेळ निश्चित करण्यासाठी संपर्क करतात. विविध विद्यापीठात दरमहिन्यास वेगवेगळया पदांसाठी होणाऱ्या आढावा समितीमध्ये उपस्थित राहणे शक्य होत नाही. विद्यापीठे व शासन प्रतिनिधी यांचा या कामासाठी वारंवार वेळेचा अपव्यय होतो हे टाळण्यासाठी विद्यापीठांतील अध्यापक, संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य अध्यापक यांच्या आढावा समितीची बैठका खालील वेळापत्रकानुसार वर्षातून केवळ ३ वेळा म्हणजे ४ महिन्यातून एकदा आयोजन करण्याबाबत या परिपत्रकान्वये निर्देश देण्यात येत आहे.

संदर्भिय क्रमांक २ मधील शासन निर्णयातील क्रमांक ६ मध्ये आढावा समित्यांनी कार्यरत असलेल्या अध्यापक/व प्राचार्य यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीच्या ६ महिन्यापुर्वी छाननी करण्याची प्रक्रिया सुरु करावी व सेवानिवृत्तीस किमान ३ महिने शिल्लक असतांना मुदतवाढीस पात्र अध्यापक/प्राचार्यांचे प्रस्ताव संचालक उच्च शिक्षण यांचेमार्फत शासनास सादर करण्याबाबत निर्देशित केले आहे. तथापि या कालमर्यादेचेही बहुतांशी विद्यापीठांकडून अनुपालन होत नसल्याचे दिसून येते. आपल्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सदरची कालमर्यादा निदर्शनास आणून द्यावी.

माहे जून, ऑक्टोबर व फेब्रुवारी या ३ महिन्यांमध्ये सदरच्या आढावा समितीची आयोजन करण्यात यावे. यामध्ये पुढील सहा महिन्यात सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व प्राचार्य/अध्यापकांच्या प्रस्तावाबाबत विचार करणे शक्य होईल. तसेच यादरम्यान सेवानिवृत्ती वयोमर्यादेसाठी प्रस्तावित केलेल्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्यास त्या त्रुटी पुर्ण करणे देखील या कालावधीत शक्य होईल. संबंधित आढावा समितीच्या बैठकीच्या ६ महिने आधी सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व अध्यापक/प्राचार्य यांचे प्रस्ताव निश्चितपणे समाविष्ठ होतील याची खातरजमा संबंधित विद्यापीठाने करणे आवश्यक आहे. तसेच सदर बैठकीचे निमंत्रण संचालक उच्च शिक्षण व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांना बैठकीच्या दिनांकापुर्वी किमान १५ दिवस अगोदर पत्राव्दारे कळविण्यात यावे.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची विद्यापीठांनी दक्षता घ्यावी, तसेच ज्यामुळे कामकाजात सुसुत्रता येवून वेळेत बचत होईल.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

**SHIVAJI UNIVERSITY**, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX – (0231) 2609000, 2609089
FAX : 0091-0231-2691533, 2692333, 2693294

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९२३३३, २६९३२९४.
Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

"A"
Re-accredited By
NAAC (2014)
With CGPA - 3.16

जा.क्र. संलग्नता/टे.५/एनडीएल/ 169 दिनांक :- 16 MAR 2015

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
अशासकीय विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालये/ मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,

विषय :- अशासकीय विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ :-
१) क्र. संकिर्ण-२०१०/(५०३/१०)विशि-१ दि. ०५ मार्च, २०११ चा शासन निर्णय,
२) क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि. २३ नोव्हेंबर, २०११ चा शासन निर्णय,
३) क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि. ०१ डिसेंबर, २०११ चा शासन निर्णय,
४) क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि. २३ फेब्रुवारी, २०१२ चे शासन शुध्दीपत्रक,

महोदय /महोदया,

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय शासन निर्यणामध्ये शासकीय/अशासकीय महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापकांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत आढावा समित्यांचे गठन तसेच इतर मार्गदर्शक सुचनांचे विस्तृत विवेचन केले आहे. परंतु त्यामध्ये अशासकीय विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक पदांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत आढावा समिती अथवा मार्गदर्शक सुचनांचा समावेश केलेला नाही. त्यामुळे सदर महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापकांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादा वाढविण्यासंदर्भात अडचणी निर्माण होत आहेत.

यासंदर्भात उपरोक्त शासन निर्णयापैकी क्रमांक १ च्या शासन निर्णयामध्ये मुद्दा क्रमांक ९ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद केली आहे.

मुद्दा क्र. ०९ **अकृषी विद्यापीठाशी संलग्नित/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय (कायम विनाअनुदानित) शैक्षणिक संस्थामधील अध्यापक/ प्राचार्य यांना मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय संबंधित संस्थेने त्यांच्या स्तरावर घ्यावा.**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविणेत येते की, **अशासकीय विनाअनुदानित तसेच व्यावसायिक महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक पदांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्यासाठी संस्थास्तरावर मार्गदर्शक तत्वानुसार निकष तपासण्या करिता समिती तयार करुन त्याचा अहवाल विद्यापीठास माहितीसाठी सादर करावा .**

कळावे,

आपला विश्वासू,

13/03/15
संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ,